केंद्र पुरस्कृत योजना सन २०१८-१९
"वन्यजीव अधिवासाचे एकात्मिक विकास कार्यक्रम" योजनांतर्गत राष्ट्रीय उद्याने / अभयारण्याकरीता निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०९.१८/प्र.क्र.३६८/भाग-२/फ-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १३ मार्च, २०१९.

वाचा :-

१. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक:- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक :- ०२.०४.२०१८.
२. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक १३-१३/२०१८-डब्ल्यूएल, दिनांक :- ३१.०८.२०१८.
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. डब्लयूएलपी-०९.१८/ प्र.क्र.३६८/फ-१, दिनांक २६.०९.२०१८.
४. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक ३४-१/२०१४-डब्ल्यूएल, दिनांक :- २०.१२.२०१८.
५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. डब्लयूएलपी-१२.१८/ प्र.क्र.३६८ (भाग-१)/फ-१, दिनांक १६.०१.२०१९.
६. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक १३-१३/२०१८-डब्ल्यूएल, दिनांक :- ०७.०२.२०१९.
७. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक कक्ष-१/सी/यो/प्र.क्र.१८/२१८८/१८-१९, दिनांक :- २८.०२.२०१९.

प्रस्तावना :-

"वन्यजीव अधिवासाचे एकात्मिक विकास कार्यक्रम" योजनांतर्गत राष्ट्रीय उद्याने / अभयारण्याचे विकासाकरीता पूर्वी केंद्र शासनाकडून अनावर्ती व आवर्ती बाबींकरीता २४०६ ०७८४ या लेखाशिर्षातंर्गत ५०% केंद्र अनुदान तसेच त्याचा अनुरुप राज्य हिस्सा ५०% अंतर्गत २४०६ २३८४ या लेखाशिर्षाचा वापर केला जात होता.

तथापि सन २०१६-१७ मध्ये सदर योजनेच्या स्वरुपात बदल करण्यात आल्याचे केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी सूचविले. त्या नुसार सन २०१६-१७ मध्ये "वन्यजीव अधिवासाचे एकात्मिक विकास कार्यक्रम" योजनांतर्गत राष्ट्रीय उद्याने / अभयारण्याचे विकासाकरीता अनावर्ती व आवर्ती सर्वसाधारण घटक कार्यबाबींसाठी केंद्र शासनाचा ६०% हिस्सा अंतर्गत २४०६ ०७८४ तर त्याच अनुरुप राज्य शासनाचा ४० % हिस्सा अंतर्गत २४०६ २३८४ व अनावर्ती व आवर्ती विशेष घटक (अनुसूचित जाती उपयोजना) कार्यबाबींसाठी केंद्र शासनाचा ६० % हिस्सा अंतर्गत २४०६ ए१६७ तर त्याच अनुरुप राज्य शासनाचा राज्य हिस्सा ४० % अंतर्गत २४०६ ए१७६ या लेखाशिर्षाचा वापर करण्यात येत आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत योजना “वन्यजीव अधिवासाचे एकात्मिक विकास कार्यक्रमा” अंतर्गत राष्ट्रीय उद्याने / अभयारण्याचे विकासाकरिता केंद्र शासनाने संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये रु. १४९५.६७ लक्षचे कार्यबाबींस केंद्र शासनाने मंजूरी प्रदान केलेली आहे. संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेतंर्गत रु. १०७२.१८५ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.
संदर्भ क्रमांक ६ च्या पत्रान्वये केंद्र शासनाने सुधारीत केंद्र हिस्सा पध्दतीनुसार “वन्यजीव अधिवासाचे एकात्मिक विकास कार्यक्रम” योजनांतर्गत राष्ट्रीय उद्याने / अभयारण्याचे विकासाकरीता सन २०१८-१९ मध्ये दूसरा हप्ता म्हणून केंद्र हिस्स्या अंतर्गत आवर्ती व अनावर्ती (सर्वसाधारण घटक) बाबींकरीता प्रथम हप्ता रु. १७९.४८२ लक्ष मंजूर केला आहे, त्या अनुषंगाने राज्य हिस्स्या अंतर्गत आवर्ती व अनावर्ती (सर्वसाधारण घटक) बाबींसाठी राज्य शासनास रु. ११९.६५४ लक्ष असे एकूण रु. २९९.१३६ लक्ष निधी मुक्त करणे अपेक्षित आहे.

<u>शासन निर्णय-</u>

सबब आता सदर शासन निर्णयान्वये **रु. २९९.१३६ लक्ष** सोबत जोडलेल्या विवरण पत्राप्रमाणे संदर्भ क्रमांक ६ च्या पत्रान्वये केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या कार्यबाबींवर खर्च करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ) सदर शासन निर्णयान्वये वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने संदर्भीय पत्रान्वये मान्यता दिलेल्या तपशीलवार कार्यबाबींवर व सदर कामांना सक्षम प्राधिका-याची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता असल्याखेरीज रक्कम खर्ची टाकण्यात येऊ नये.

आ) वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच केंद्र शासनाने प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

इ) प्रस्तावित असलेल्या मोठया बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची संबंधीत नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील.

ई) वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१३१५०७२५२३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2019.03.14 11:38:59 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, नागपूर.
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
६) महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
७) फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).

******

शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०९.१८/प्र. क्र. ३६८/भाग-२/फ-१, दिनंक :- १३ मार्च, २०१९ सोबतचे विवरणपत्र

(रु. लाखात)

अ.क्र.	योजना/लेखाशीर्ष	केंद्र शासनाद्वारे वितरीत निधी		शासन निर्णय दिनांक २६.०९.२०१८ अन्वये वितरीत निधी	सदर शासन निर्णयान्वये वितरीत करावयाचा निधी
		प्रथम हप्ता	दूसरा हप्ता		
१	“सर्वसाधारण घटक”(२४०६ ०७८४)(६०%)केंद्र हिस्सा (राष्ट्रीय उद्याने/अभयारण्याचे विकास)	५८३.३१	१७९.४८२	५८३.३१	१७९.४८२
२	“अनुसूचित जाती उपयोजना”(२४०६ ए१६७) (६०%)केंद्र हिस्सा (वन्यजीव अधिवासाचे एकात्मिक विकास)	१३४.६१	०.००	६०.००	०.००
	एकूण केंद्र हिस्सा	**७१७.९२**	**१७९.४८२**	**६४३.३१**	**१७९.४८२**
३	“सर्वसाधारण घटक”(२४०६ २३८४) (४०%)राज्य हिस्सा (राष्ट्रीय दद्याने/अभयारण्याचे विकास)	३८८.८७५	११९.६५४	३८८.८७५	११९.६५४
४	“अनुसूचित जाती उपयोजना” (२४०६ ए१७६) (४०%)राज्या हिस्सा (वन्यजीव अधिवासाचे एकात्मिक विकास)	८९.७४	०.००	४०.००	०.००
	केंद्र हिस्स्या अनुरुन एकूण राज्य हिस्सा	**४७८.६२**	**११९.६५४**	**४२८.८७५**	**११९.६५४**
	एकूण एकंदर	**११९६.५४**	**२९९.१३६**	**१०७२.१८५**	**२९९.१३६**

****